# प्रकरण - चार

## इयत्ता ११ वी व १२ वीच्या मराठीच्या पाठ्य-पुस्तकांचे मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने विश्लेषण

४.१ प्रास्ताविक

४.२ इयत्ता ११ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांचे मूल्यांच्या दृष्टीने विश्लेषण

४.३ मूल्ये आणि त्यावर आधारित इयत्ता ११ वीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ

४.४ इयत्ता १२ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांचे मूल्यांच्या दृष्टीने विश्लेषण

४.५ मूल्ये आणि त्यावर आधारित इयत्ता १२ वीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ

४.६ समारोप.

## ४.१ प्रास्ताविक :

प्रस्तुत शोधनिबंध हा उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठयपुस्तकांमधून विद्यार्थ्यांमध्ये कोणती मूल्ये संक्रमित करता येतील या संबंधीचा आहे.

जी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करावयाची ती पाठात अनुस्यूत असलेली मूल्ये कोणती हे तपासून पाहिले पाहिजे. त्यासाठी इयत्ता ११ वी व १२ वीच्या मराठीच्या पाठयपुस्तकांत जे गद्य व पद्य पाठ आहेत त्यातील मूल्यांचा शोध घेतला आहे.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १२ मध्ये इयत्ता ११ वीचे गद्य व प्रश्न क्रमांक १३ मध्ये पद्य धडे देऊन त्या पुढील स्तंभ ३ मध्ये त्या पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये नमूद केलेली होती. (पहा प्रश्नावली, परिशिष्ट ' अ ' पृष्ठांक १९१ ) तसेच प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १४ मध्ये इयत्ता १२ वीचे गद्य व प्रश्न क्रमांक १५ मध्ये पद्य धडे देऊन त्या पुढील स्तंभ ३ मध्ये त्या पाठांतून प्रतिबिंबित होणारी मूल्ये नमूद केलेली होती. (पहा प्रश्नावली, परिशिष्ट ' अ ' पृष्ठांक १९७ ) या नमूद केलेल्या मूल्यांव्यतिरिक्त आणखी काही मूल्ये त्या पाठात असतील किंवा आहेत असे अध्यापकांना वाटत असल्यास ती स्तंभ ४ मध्ये नमूद करावयास सांगितली होती. ती नमूद केलेली मूल्ये लक्षात घेऊन व त्या पाठांतून ती प्रतिबिंबित होतात किंवा नाही याची खातरजमा करून पाठांतून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांची यादी पुढील सारणी क्रमांक ४,१ मध्ये दिलेली आहे.

## ४.२ इयत्ता ११ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठाचे मूल्यांच्यादृष्टीने विश्लेषण :

### सारणी क्रमांक ४.१

### गद्य विभाग

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १ | पासाल बालक पांगुरवणे | कर्तव्यदक्षता, गुणग्राहकता, वात्सल्य, भक्ती. |
| २ | फौज भागीरथीस पार गेली | शौर्य, पराक्रम, कारुण्य, युध्दकौशल्य, समयसूचकता, ऐतिहासिक घटनांचे ज्ञान. |
| ३ | इष्ठ असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार | सामाजिक ऐक्य, बुध्दीप्रामाण्यवादी दृष्टिकोन, सामाजिक बदलाची जाणीव, सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोन, आत्मसन्मान. |
| ४ | तीन चंद्र | ऐतिहासिक घटनांचे ज्ञान, निसर्ग प्रेम, मानवी प्रेमाविष्कार. |
| ५ | आमची कैफियत | स्त्री-पुरुष समता, सामाजिक समता, दास्यमुक्ती, विचारांचा परखडपणा. |
| ६ | आम्ही युग बनविणारे आहोत | दातृत्व, सर्वोदय, आत्मनिरीक्षण, आत्मसन्मान, कर्तव्यबुध्दी, श्रेष्ठवारशाचे जतन, आशावाद. |
| ७ | मोत्यांचे पीक | संपत्तीच्या मोहाचे दुष्परिणाम, प्रेम, मानवता, नि:स्वार्थता, पावित्र्य, अन्न हे पूर्णब्रम्ह (मूल्यश्रेष्ठ). |
| ८ | न्या. महादेव गोविंद रानडे | मानवनिष्ठा, मानवधर्म, देशहित, आत्मसन्मान, देशप्रेम, सामाजिक सुधारणावादी दृष्टिकोन, व्यासंग, राजकीय जागृती, दृष्टेपणा, मुत्सद्देगिरी, मानवमुक्ती, नेतृत्व बहुश्रुतता. |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| ९ | कोलंबी दर्शन | जिज्ञासा, निरीक्षण, आत्मसंवेदन, राष्ट्रप्रेम, भूतदया. |
| १० | सामाजिक लोकशाहीचे प्रणेते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर | सार्वजनिक ध्येयनिष्ठा, स्वातंत्र्य, बंधुभावात्मक सहानुभूति, समता, ऐक्य, आदराची व समतेची भावना, बंधमुक्त, समाज, सामाजिक लोकशाही, भेदविरहित समाज. |
| ११ | नागोबा पाठक | अपराभूत मनोवृत्ती, सहनशीलता, कुटुंबवत्सलता, शौर्य, बलोपासना, परोपकार, स्वभावातील कणखरपणा, अकृत्रिमपणा. |
| १२ | हे जग मी सुंदर करून जाईन | सूक्ष्मनिरीक्षण, जिद्द, गौरव, आत्म-सन्मान, विधायक कार्याची ओढ, नवनिर्मिती, सहानुभूति, स्नेह, अध्ययन, प्रगतीचे तत्व, दीर्घोद्योग, साहित्य प्रेम. |
| १३ | झाडीचे दिवस | अध्ययनातील नियमितपणा, निसर्ग प्रेम, इतिहासाचा सार्थ अभिमान, निसर्गा-बद्दल कुतूहल. |
| १४ | वाट | कर्तव्यपालन, मातृप्रेम, वात्सल्य, सामाजिक बांधिलकी, दुर्दम्य इच्छा. |
| १५ | 'माणूस' ची जन्मकथा | गरिबांविषयी आपुलकी-प्रेम, माणुसकी, परोपकार, अन्यायाचा प्रतिकार, शौर्य, पराक्रम, मित्रता, उदारमतवाद, पुरोगामी विचार, सहानुभूति, सर्वधर्मसमभाव, प्रामाणिकपणा. |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १६ | अंतराळ शोध | संशोधनवृत्ती, जिज्ञासा, जिद्द, कुतूहल, संरक्षण, विज्ञान अभिरुची, साहस. |
| १७ | जहाज फुटत आहे. | दारिद्र्याचे दुष्परिणाम, बेकारीचे दुष्परिणाम, समाजहित, राष्ट्रहित, सामाजिक समता, आर्थिक समता, विषमतेविरुध्द चीड, आशावाद, प्रयत्नवाद, राष्ट्रीय ऐक्य. |
| १८ | पाणी | आशावाद, प्रयत्नवाद, समस्या निर्मूलन, विषमतेचे दुष्परिणाम, वृक्ष संगोपन. |
| १९ | वर्तुळ | निसर्ग-मानव संबंध, निसर्गाशी तादात्म्य, आंतरिक समाधान, निर्व्याज आनंद. |
| २० | चूल आणि महाल | स्वजनांविषयी आत्मियता, स्वजनांविषयी सहानुभूति, सामाजिक बांधिलकी, गुंडगिरीविषयी तिरस्कार, अज्ञान व गुलामगिरीविषयी तिरस्कार. |

<u>सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)</u>

<u>पद्य विभाग</u>

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १ | अभय आणि सत्वसंशुध्दी | अभय, सत्वशुध्दी, दैवी संपत्ती, अद्वैतभाव. |
| २ | उत्तमाचा पायी असिजे | कुसंगतीचे दुष्परिणाम, सुसंगतीचे महत्व. |
| ३ | संतवाणी | |
| | अ) ताटीचे अभंग | सहनशीलता, योग्यतेची जाणीव, धिटाई, लोकोध्दार कार्यात प्रोत्साहन, षड्रिपुंवर विजय |
| | आ) माहेड | मनोविकारांचे दमन, षड्विकारांवर विजय, गुरुची कृपादृष्टी. |
| | इ) अभंग | परमेश्वराची ओढ, ईश्वरप्राप्तीचा आनंद, प्रपंचातील परमार्थ. |
| ४ | युध्द वर्णन | शौर्य, पराक्रम. |
| ५ | देशभाषा कडिले लेणे | स्वभाषा प्रेम, आत्मविश्वास, मातृभाषेचा सार्थ अभिमान. |
| ६ | अंधार नगरी बेबंद | अन्यायाची चीड, अन्यायाला विरोध, कर्तृत्व. |
| ७ | हरपलेले श्रेय | श्रेयाचा शोध, निसर्ग सान्निध्यात निजश्रेयाचा शोध, मोक्षाची ओढ, अनंताचा शोध. |
| ८ | चाफा | शुध्द प्रेम भावना, उदात्त प्रेम. |
| ९ | फुले वेचली पण | निष्प्रेमजीवनाची खंत, सहृदयता, मानवता. |
| १० | उशिराचा पाऊस | क्षमाशीलवृत्ती, स्वागतशीलवृत्ती, निसर्ग प्रेम. |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| ११ | दिवितिजी आहे मरते ग | निसर्गाशी तादात्म्य, निसर्ग प्रेम, निसर्ग ओढ, रसिकता. |
| १२ | झोपली ग कुठी बाळे | मानवी मूल्यांच्या ऱ्हासाबद्दल वेदना, महायुध्दाचे दुष्परिणाम, यंत्रसंस्कृतीचे दुष्परिणाम. |
| १३ | कसा मी कळेना | आत्मनिरीक्षण, आत्मशोध, आत्मानुभूती, स्वत्वाची जाणीव. |
| १४ | जगण्याचं पात्र | उन्नत जीवन, जीवनातील उत्कटता, संवेदनशीलता. |
| १५ | अंतराळ उले | निसर्गप्रेम, नवजीवनाची प्रतिक्षा, आर्तता. |
| १६ | आमाळ | अन्यायाचा प्रतिकार, समग्र क्रांती, जिद्द, आत्मविश्वास, सहजीवन, कृतज्ञतेची भावना. |
| १७ | लपक झापक झाडांतुन | रसिकता, निसर्गप्रेम, काव्यात्मता. |
| १८ | कबीरा | हिंदु-मुस्लिम एकता, मानवता, चिरंतनत्व, सामाजिक अन्यायाविषयी चीड. |
| १९ | माझ्या डोळ्यांसमोरुन | चिंतनशीलता, आशावाद, जिद्द, ग्रामीण स्त्री जीवनातील दु:खांची जाण, सहनशीलता. |
| २० | माथा व हात | स्वबळावर स्वकर्तृत्वाची घडण, दैववादी मनोवृत्तींची परामूतता. |

वरील सारणी क्रमांक ४.१ मध्ये इयत्ता ११ वीच्या गद्य व पद्य पाठांतून कोणती मूल्यें प्रतिबिंबित होतात ते पाहिले. पुढील सारणी क्र. ४.२ मध्ये मूल्य हा आधार घेऊन ती मूल्ये कोणकोणत्या पाठात येतात ✓ ते दाखविलेले आहे.

४.३ मूल्ये आणि त्यावर आधारित इयत्ता
११ वीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ :

सारणी क्रमांक ४.२

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | कर्तव्यदक्षता | १ | गद्य | पाखाल बालक पांगुरवणे |
| | कर्तव्यबुध्दी | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत |
| | कर्तव्यपालन | १४ | गद्य | वाट |
| २. | गुणग्राहकता | १ | गद्य | पाखाल बालक पांगुरवणे |
| ३. | वात्सल्य | १ | गद्य | पाखाल बालक पांगुरवणे |
| | | १४ | गद्य | वाट |
| ४. | भक्ती | १ | गद्य | पाखाल बालक पांगुरवणे |
| ५. | शौर्य | २ | गद्य | फौज भागीरथीस पार केली |
| | | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| | | १५ | गद्य | ` माणूस ` ची जन्मकथा |
| | | ४ | पद्य | युध्द वर्णन |
| ६. | पराक्रम | २ | गद्य | फौज भागीरथीस पार गेली |
| | | १५ | गद्य | ` माणूस ` ची जन्मकथा |
| | | ४ | पद्य | युध्द वर्णन |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७. | कारुण्य | २ | गद्य | फौज भागीरथीस पार गेली. |
| ८. | युध्दकौशल्य | २ | गद्य | फौज भागीरथीस पार गेली. |
| ९. | समयसूचकता | २ | गद्य | फौज भागीरथीस पार गेली. |
| १०. | ऐतिहासिक घटनांचे ज्ञान | २ | गद्य | फौज भागीरथीस पार गेली. |
| | | ४ | गद्य | तीन चंद्र. |
| ११. | सामाजिक ऐक्य | ३ | गद्य | इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार. |
| | | १० | गद्य | सामाजिक लोकशाहिचे प्रणेते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| १२. | बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टिकोन | ३ | गद्य | इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेलते ते करणार. |
| १३. | सामाजिक सुधारणा-वादी दृष्टिकोन | ३ | गद्य | इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार. |
| | | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| १४. | सामाजिक बदलाची जाणीव | ३ | गद्य | इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार |
| १५. | आत्मसन्मान | ३ | गद्य | इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार. |
| | | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत |
| | | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| | | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू....)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १६. | निसर्गप्रेम | ४ | गद्य | तीन चंद्र |
| | | १३ | गद्य | झाडीचे दिवस |
| | | १० | पद्य | उशिराचा पाऊस |
| | | ११ | पद्य | दिलीजी आले ग मरते |
| | | १५ | पद्य | अंतराळ उले |
| | | १७ | पद्य | लमक झापक झाडांतून |
| १७. | मानवी प्रेमाविष्कार | ४ | गद्य | तीन चंद्र |
| १८. | स्त्रीपुरुष समता | ५ | गद्य | आमची कैफियत |
| १९. | ग्रामीण स्त्रीजीवनातील दु:खाची जाण | १९ | पद्य | माझ्या डोळ्यांसमोरून |
| २० | सामाजिक समता | ५ | गद्य | आमची कैफियत |
| | | १० | गद्य | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| | | १७ | गद्य | जहाल फुटलं आहे |
| २१. | दास्यमुक्ती | ५ | गद्य | आमची कैफियत |
| २२. | विचारांचा परखडपणा | ५ | गद्य | आमची कैफियत |
| २३. | दातृत्व | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत. |
| २४. | सर्वोदय | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत. |
| २५. | आत्मनिरीक्षण | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत |
| | | १३ | पद्य | कसा मी कळेन |
| २६. | श्रेष्ठ वारशाचे जतन | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २७. | आशावाद | ६ | गद्य | आम्ही युग बनविणारे आहोत |
| | | १७ | गद्य | जहाज फुटल आहे |
| | | १८ | गद्य | पाणी |
| | | १९ | पद्य | माझ्या डोळ्यांसमोरून. |
| २८. | संपत्तीच्या मोहाचे दुष्परिणाम | ७ | गद्य | मोत्यांचे पीक |
| २९. | प्रेम / | ७ | गद्य | मोत्यांचे पीक |
| | शुध्द प्रेम / | ८ | पद्य | चाफा |
| | उदात्त प्रेम | ८ | पद्य | चाफा. |
| ३०. | मानवता | ७ | गद्य | मोत्यांचे पीक |
| | मानवता | १५ | गद्य | ` माणूस ` ची जन्मकथा |
| | मानवता/ | ९ | पद्य | फुले वेचली पण |
| | मानवता | १८ | पद्य | कबीरा |
| | मानव धर्म | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| | मानव निष्ठा/ | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| | मानव मुक्ती | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ३१. | नि:स्वार्थता | ७ | गद्य | मोत्यांचे पीक. |
| ३२. | पावित्र्य | ७ | गद्य | मोत्यांचे पीक. |
| ३३. | अन्न हे पूर्ण ब्रह्म | ७ | गद्य | मोत्यांचे पीक. |
| ३४. | समाजहित | १७ | गद्य | जहाज फुटलं आहेत. |
| ३५. | देश हित/ | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| | राष्ट्र हित | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| ३६. | देश प्रेम/ | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| | राष्ट्र प्रेम | ९ | गद्य | कोलंबो दर्शन |

<u>सारणी क्र. ४.२ (पुढे चालू...)</u>

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३७. | व्यासंग | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ३८. | राजकीय जागृती | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ३९. | दृष्टेपणा | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ४०. | मुत्सद्देगिरी | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ४१. | नेतृत्व | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ४२. | बहुश्रुतता | ८ | गद्य | न्या. महादेव गोविंद रानडे |
| ४३. | जिज्ञासा | ९ | गद्य | कोलंबो दर्शन |
| | | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ४४. | निरीक्षण | ९ | गद्य | कोलंबो दर्शन |
| | निरीक्षण | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन. |
| ४५. | आत्मसंवेदन | ९ | गद्य | कोलंबो दर्शन |
| ४६. | भूतदया | ९ | पद्य | कोलंबो दर्शन |
| ४७. | सार्वजनिक ध्येयनिष्ठा | ६ | १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| ४८. | स्वातंत्र्य | गद्य | १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| ४९. | बंधुभावात्मक सहानुभूति/ | गद्य | १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| | सहानुभूति/ | गद्य | १५ | 'माणूस' ची जन्मकथा |
| | सहानुभूति | गद्य | १२ | हे जग मी सुंदर करून जाईन |
| | (स्वजनांविषयी) | गद्य | २० | चूल आणि महाल. |
| ५०. | स्वजनांविषयी आत्मियता | गद्य | २० | चूल आणि महाल |
| ५१. | बंधमुक्त समाज | गद्य | १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| ५२. | सामाजिक लोकशाही | गद्य | १० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |

सारणी क्र.४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ५३. | भेदविरहित समाज | गद्य | गद्य | डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| ५४. | अरामूत मनोवृत्ती | गद्य | गद्य | नागोबा पाठक |
| ५५. | सहनशीलता | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| ५६. | सहनशीलता | ३ | पद्य | ताटीचे अभंग |
| | सहनशीलता | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| | सहनशीलता | १९ | पद्य | माझ्या डोळ्यां समोरून |
| ५६. | परोपकार | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| | परोपकार | १५ | गद्य | ` माणूस ` ची जन्मकथा |
| ५७. | स्वभावातील कणखरपणा | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| ५८. | अकृत्रिमपणा | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| ५९. | जिद्द | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| | | १९ | पद्य | माझ्या डोळ्यांसमोरून |
| | | १६ | पद्य | आभाळ |
| | | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ६०. | विधायक कार्याची ओढ | गद्य | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| ६१. | कुटुंबवत्सलता | ११ | गद्य | नागोबा पाठक |
| ६२. | नवनिर्मिती | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| ६३. | गौरव | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| ६४. | स्नेह | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| ६५. | अध्ययन/अध्यापनातील नियमितपणा | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| | | १३ | गद्य | झाडीचे दिवस |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ६६. | प्रगतीचे तत्व दीर्घोद्योग | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| ६७. | इतिहासाचा सार्थ अभिमान | १३ | गद्य | झाडीचे दिवस |
| ६८. | निसर्गाबद्दल कुतूहल | १३ | गद्य | झाडीचे दिवस |
| ६९. | निसर्ग-मानव संबंध/ | १९ | गद्य | वर्तुळ |
| | निसर्गाशी तादात्म्य/ | १९ | गद्य | वर्तुळ |
| | | ११ | पद्य | दिवाळी आली मराठे ग |
| | निसर्ग ओढ/ | ११ | पद्य | दिवाळी आली मराठे ग |
| | निसर्ग सान्निध्यात निजश्रेयाचा शोध | ७ | पद्य | हरपलेले श्रेय |
| ७०. | साहित्य प्रेम | १२ | गद्य | हे जग मी सुंदर करून जाईन |
| ७१. | मातृप्रेम | १४ | गद्य | वाट |
| ७२. | सामाजिक बांधिलकी | १४ | गद्य | वाट |
| | | २० | गद्य | चूल आणि महाल |
| ७३. | दुर्दम्य इच्छा | १४ | गद्य | वाट |
| ७४. | गरिबांविषयी आपुलकी | १५ | गद्य | ' माणूस ' ची जन्मकथा |
| ७५. | अन्यायाचा प्रतिकार | १५ | गद्य | ' माणूस ' ची जन्मकथा |
| | | ६ | पद्य | अंधार नगरी बेबंद |
| | | १६ | पद्य | आभाळ |
| ७६. | अन्यायाची चीड | ६ | पद्य | अंधार नगरी बेबंद |
| | | १८ | पद्य | कबीरा |
| ७७. | मित्रता | १५ | गद्य | ' माणूस ' ची जन्मकथा |

<u>सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)</u>

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७८. | उदारमतवाद | १५ | गद्य | `माणूस` ची जन्मकथा |
| ७९. | पुरोगामी विचार | १५ | गद्य | `माणूस` ची जन्मकथा |
| ८०. | सर्वधर्मसमभाव/ | १५ | गद्य | `माणूस` ची जन्मकथा |
| | हिंदु-मुस्लिम एकता | १८ | पद्य | कबीरा |
| ८१. | प्रामाणिकपणा | १५ | गद्य | `माणूस` ची जन्मकथा |
| ८२. | संशोधनवृत्ती | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ८३. | कुतूहल | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ८४. | संरक्षण | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ८५. | विज्ञान अभिरुची | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ८६. | साहस | १६ | गद्य | अंतराळ शोध |
| ८७. | दारिद्र्याचे दुष्परिणाम/ | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| | बेकारीचे दुष्परिणाम | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| | विषमतेचे दुष्परिणाम | १८ | गद्य | पाणी |
| ८८. | आर्थिक समता | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| ८९. | विषमते विरूध्द चीड | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| ९०. | प्रयत्नवाद | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| | | १८ | गद्य | पाणी |
| ९१. | समस्या निर्मूलन | १८ | गद्य | पाणी |
| ९२. | राष्ट्रीय ऐक्य | १७ | गद्य | जहाज फुटलं आहे |
| ९३. | वृक्ष संगोपन | १८ | गद्य | पाणी |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ९४. | आंतरिक समाधान | १९ | गद्य | वर्तुळ |
| ९५. | निर्व्याज आनंद | १९ | गद्य | वर्तुळ |
| ९६. | गुंडगिरी विषयी तिरस्कार | २० | गद्य | चूल आणि महाल |
| ९७. | अज्ञानाविषयी तिरस्कार | २० | गद्य | चूल आणि महाल |
| ९८. | गुलामगिरी विषयी तिरस्कार | २० | गद्य | चूल आणि महाल |
| ९९. | अभय | १ | पद्य | अभय आणि सत्वसंशुध्दी |
| १००. | सत्वशुध्दी | १ | पद्य | अभय आणि सत्वसंशुध्दी |
| १०१. | दैवी संपत्ती | १ | पद्य | अभय आणि सत्वसंशुध्दी |
| १०२. | अद्वैतभाव | १ | पद्य | अभय आणि सत्वसंशुध्दी |
| १०३. | कुसंगतीचे दुष्परिणाम | २ | पद्य | उत्तमाचापपायी असिजे |
| १०४. | सुसंगतीचे महत्व | २ | पद्य | उत्तमाचा पायी असिजे |
| १०५. | योग्यतेची जाणीव | ३(अ) | पद्य | ताटीचे अभंग |
| १०६. | स्वागतशील वृत्ती | १० | पद्य | उशिराचा पाऊस |
| १०७. | क्षमाशील वृत्ती | १० | पद्य | उशिराचा पाऊस |
| १०८. | महायुध्दाचे दुष्परिणाम | १२ | पद्य | झोपली ग सुकी बाळे |
| १०९. | यंत्रसंस्कृतीचे दुष्परिणाम | १२ | पद्य | झोपली ग सुकी बाळे |
| ११०. | आत्मशोध | १३ | पद्य | कसा मी कळेना |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १११. | मानवी मूल्यांच्या -हासाबद्दल वेदना | १२ | पद्य | झोपली ग सुखी बाळे |
| ११२. | आत्मानुभूती | १३ | पद्य | कसा मी कळेना |
| ११३. | स्वत्वाची जाणीव | १३ | पद्य | कसा मी कळेना |
| ११४. | उन्नत जीवन | १४ | पद्य | जगण्याचे पात्र |
| ११५. | जीवनातील उत्कटता | १४ | पद्य | जगण्याचे पात्र |
| ११६. | संवेदनशीलता | १४ | पद्य | जगण्याचे पात्र |
| ११७. | नवजीवनाची प्रतिज्ञा | १५ | पद्य | अंतराळ उले |
| ११८. | आर्तता | १५ | पद्य | अंतराळ उले |
| ११९. | सहजीवन | १६ | पद्य | आमाळ |
| १२०. | कृतज्ञतेची भावना | १६ | पद्य | आमाळ |
| १२१. | काव्यात्मता | १७ | पद्य | लमक झापक झाडांतुन |
| १२२. | चिंतनशीलता | १९ | पद्य | माझ्या डोळ्यांसमोरून |
| १२३. | धिटाई | ३(अ) | पद्य | ताटीचे अभंग |
| १२४. | लोकोध्दार कार्यात प्रोत्साहन | ३(अ) | पद्य | ताटीचे अभंग |
| १२५. | षड्रिपुंवर विजय | ३(अ) | पद्य | ताटीचे अभंग |
| | | ३(आ) | पद्य | मारुड |
| १२६. | मनोविकारांचे दमन | ३(आ) | पद्य | मारुड |
| १२७. | गुरूची कृपादृष्टी | ३(आ) | पद्य | मारुड |
| १२८. | परमेश्वराची ओढ | ३(इ) | पद्य | अभंग |

सारणी क्रमांक ४.२ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १२९. | परमेश्वरप्राप्तीचा आनंद | ३(इ) | पद्य | अभंग |
| १३०. | प्रपंचातील परमार्थ | ३(इ) | पद्य | अभंग |
| १३१. | स्वभाषा प्रेम | ५ | पद्य | देशभाषा घडिले लेणे |
| १३२. | आत्मविश्वास | ५ | पद्य | देशभाषा घडिले लेणे |
| | | १६ | पद्य | आभाळ |
| १३३. | कर्तृत्व | ६ | पद्य | अंधार नगरी बेबंद |
| १३४. | श्रेयाचा शोध | ७ | पद्य | हरपलेले श्रेय |
| १३५. | मोदाची ओढ | ७ | पद्य | हरपलेले श्रेय |
| १३६. | अनंताचा शोध | ७ | पद्य | हरपलेले श्रेय |
| १३७. | निष्प्रेम जीवनाची खंत | ९ | पद्य | फुले वेचली पण |
| १३८. | सहृदयता | ९ | पद्य | फुले वेचली पण |
| १३९. | रसिकता | ११ | पद्य | दिवाळी आले मरते ग |
| | | १७ | पद्य | लमक झापक झाडांतुन |
| १४०. | स्वबळावर स्वकर्तृत्वाची घडण | २० | पद्य | माथा व हात |
| १४१. | दैववादी मनोवृत्तींची पराभूतता | २० | पद्य | माथा व हात |

वरील सारणी क्रमांक ४.२ वरून असे आढळून येते की ` युवक भारती ` इयत्ता ११ वीच्या पाठयपुस्तकामध्ये असलेल्या २० गद्य व २० पद्य अशा एकूण ४० पाठांमधून १४१ मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत.

## ४.४ इयत्ता १२ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांचे मूल्यांच्यादृष्टीने विश्लेषण (युवक भारती - इयत्ता १२ वी)

### सारणी क्रमांक ४.३

### गद्य विभाग

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १ | माळेकराचा दृष्टांत | न्याय, सदाचाराचा स्विकार. |
| २ | आरमार | दूरदृष्टी, स्वराज्यनीति, वृत्त प्रेम, राष्ट्रपुरुषांबद्दल आदर. |
| ३ | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे | स्वातंत्र्य, समता, मानवता, विश्वबंधुत्व, ज्ञानप्रसार. |
| ४ | जशी संस्कृती तसे हत्यार | वैज्ञानिक प्रगती, सामाजिक प्रगती, अहिंसा, सहनशीलता, मुत्सद्दीपणा/व्यवहार चातुर्य. |
| ५ | माणूस जगतो कशासाठी ? | जीजीविषा/जीवनासक्ती, ध्येयनिष्ठा, कलेचे जीवनातील महत्व. |
| ६ | क्रांतिप्रवण तरुण | शौर्य, साहस, सेवा, पावित्र्य, परोपकारी वृत्ती, शिस्त, विवेकयुक्त नविनता, आशावाद, जीवननिष्ठा, पूज्यबुध्दी, गरीबांविषयी आपलेपणा, सामाजिक समता, समाजहित, तत्परता, तेजस्विता/तपस्विता, मानव्याचे स्वराज्य. |
| ७ | आचार्य दर्शन | गुरुनिष्ठा, गुरुश्रध्दा, जिज्ञासा, ज्ञान-प्राप्तीची ओढ, निसर्गातील ईश्वरी अस्तित्व. |

सारणी क्र. ४.३ (पुढे चालू...)

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| ८ | सक्तमजुरीत मस्त | मातृप्रेम, सहृदयता-सामान्यांविषयी ओढ, उद्योगीवृत्ती, सहजीवन, अहिंसा, स्वातंत्र्य प्रेम, असीम त्याग, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, खिलाडूवृत्ती. |
| ९ | मिक्षामिसे जन परिक्षावे | रूढी व अंधश्रध्दा निर्मूलन, सदुपदेश, सतपुरुषांबद्दल आदर, स्वच्छता, वैज्ञानिक दृष्टिकोन, समाजशिक्षण. |
| १० | पाटनूरचा जंगल सत्याग्रह | अन्यायाचा प्रतिकार, स्वातंत्र्य प्रेम, शांतता, मानवता, सत्याग्रह, संघटना चातुर्य. |
| ११ | विष्णुपंत कुलकर्णी | नेतृत्व, निडरता, लढाऊबाणा, जीजिविषा, गरिबांविषयी आपुलकी, सामाजिक न्याय. |
| १२ | मी : माणिकराव पाटील | स्वतंत्र विचार पध्दती-विचारातील सुक्षपणा, स्वभावातील मनमोकळेपणा, अनुभव व निरीक्षण यातून शिक्षण/ गुणग्राहकता. |
| १३ | हा माणूस आहे की राक्षस ? | समाजहित/समाजकल्याण, मानवता, त्याग, धाडस, जिज्ञासा. |
| १४ | बहुरूपी | लोकसंस्कृती विषयी ज्ञान, आस्था, लोककलाकारांचा परिचय. |
| १५ | गड्या आपुला गाव बरा | माणुसकी, स्वदेश प्रेम, जिव्हाळा, स्वसंस्कृती प्रेम. |

सारणी क्र. ४.१ (पुढे चालू...)

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १६ | मजल्यांचं घर | अस्मितेची जाणीव, जिद्द, ममता, जिव्हाळा, कर्तृत्व, परंपरा विरोध, कुटुंब वत्सलता. |
| १७ | बुलासराव बाप्पू | सामाजिक बांधिलकी, पारंपारिक रीतिरिवाजांचे महत्व. |
| १८ | चाफा | निसर्ग प्रेम. |
| १९ | संगणक आणि आपण | सामाजिक बदलाची जाणीव, विज्ञान-विषयक दृष्टिकोन, विकासविषयक ज्ञान. |
| | **पद्य विभाग** | |
| १ | शांताचे या घरा | मातृभाषेविषयी प्रेम, संतवृत्ती, परमार्थ ज्ञान, शांतता, भक्ती, नम्रता, श्रोत्यांशी जवळीक. |
| २ | संतवाणी | |
| | अ) नामदेव | भक्ती, ईश्वरनिष्ठा, समता, संतवृत्ती. |
| | आ) नरहरी सोनार | भक्ती. |
| | इ) चोखामेळा | समता. |
| | ई) एकनाथ | अंधश्रध्दा निर्मूलन. |
| | उ) तुकाराम | आत्मोध्दार, समाजप्रबोधन. |
| ३ | धाव धाव गा श्रीपती | भक्ती-परमेश्वराची आळवणी/प्रार्थना, अद्वैतभाव, दुष्टांचे पारिपत्य-सज्जनांचे संरक्षण. |

सारणी क्र.४.३ (पुढे चालू....)

| पाठ क्रमांक | पाठाचे नाव | प्रतिबिंबित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| ४ | घनश्याम सुंदरा | निसर्गवर्णन, भक्ती, ईश्वरी गुणगान, कर्तव्यनिष्ठा, नम्रता।लीनता. |
| ५ | झापूझा | असामान्याचा अलौकिक अनुभव. |
| ६ | रुद्रास आवाहन | अशुभाचा संहार. |
| ७ | माझी माय सरसोती | निसर्गातील ईश्वरी अस्तित्व, सौंदर्यानुभव |
| ८ | चिंतातुर जंतू | सृष्टितील भव्यता व सौंदर्यबोध. |
| ९ | या दु:खाच्या कढईची | सहनशीलता, संयम, श्रध्दा. |
| १० | शासन | अध:पतनाची खंत, आत्मविश्वास. |
| ११ | आईपणाची भीती | आत्मोध्दार, मानवता. |
| १२ | पाऊस | निसर्गप्रेम. |
| १३ | शापित मी मागतो | लौकिक जीवनाची ओढ, स्वातंत्र्याची ओढ. |
| १४ | जाईन दूर गावा | निर्मोहिपणा. |
| १५ | बाप रे | दारिद्र्याविषयी चीड, आर्थिक समता/ समाजवादी समाजरचना. |
| १६ | आता | (एकाकीपणाचे दु:ख) समाजजीवनाची ओढ |
| १७ | फिर्याद | सामाजिक न्याय, स्त्री-पुरुष समता. |
| १८ | खापराचे दिवे | आशावाद. |
| १९ | गढी | समता, संघशक्तीचे महत्व, पारंपारिकतेला विरोध. |
| २० | माझ्या शब्दांनो | स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व. |

वरील सारणी क्रमांक ४.३ मध्ये इयत्ता १२ वीच्या गद्य व पद्य पाठांतून कोणती मूल्ये प्रतिबिंबित होतात ते पाहिले. पुढील सारणी क्रमांक ४.४ मध्ये मूल्य हा आधार घेऊन ती मूल्ये कोणकोणत्या पाठांत येतात ते दाखविलेले आहे.

सारणी क्रमांक ४.४

मूल्ये आणि त्यावर आधारित इयत्ता १२ वीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ क्रमांक | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | न्याय | १ | गद्य | माळेकराचा दृष्टांत |
| २ | सामाजिक न्याय | ११ | गद्य | विष्णुपंत कुलकर्णी |
| | | १७ | पद्य | फिर्याद |
| ३ | सदाचाराचा स्विकार | १ | गद्य | माळेकरांचा दृष्टांत |
| ४ | दूरदृष्टी | २ | गद्य | आरमार |
| ५ | स्वराज्यनीती | २ | गद्य | आरमार |
| ६ | वृक्षप्रेम | २ | गद्य | आरमार |
| ७ | राष्ट्रपुरुषांबद्दल आदर/ | २ | गद्य | आरमार |
| | सत्पुरुषांबद्दल आदर | ९ | गद्य | मिक्षामिसे जन परिक्षावे |
| ८ | स्वातंत्र्य/ | ३ | गद्य | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे |
| | | २० | पद्य | माझ्या शब्दानों |
| | स्वातंत्र्य प्रेम/ | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त |
| | | १० | गद्य | पाटनरचा जंगल सत्याग्रह |
| | स्वातंत्र्याची ओढ | १३ | पद्य | शापित मी ... तगमगतो. |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रकार | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ९ | समता | २० | पद्य | माझ्या शब्दांनो |
| | | १९ | पद्य | गढी |
| | | २(इ) | पद्य | चोखामेळा |
| | | ३ | गद्य | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे |
| | | २(अ) | पद्य | नामदेव |
| | सामाजिक समता- | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरुण |
| | स्त्री-पुरुष समता | १७ | पद्य | फिर्याद |
| १० | आर्थिक समता- दारिद्र्याविषयी चीड-दारिद्र्या- समाजवादी समाज- रचना | १५ | पद्य | बाप रे |
| ११ | मानवता | १० | गद्य | पाटनूरचा जंगल सत्याग्रह |
| | | ११ | पद्य | आईपणाची मीती |
| | | ३ | गद्य | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे |
| | | १३ | गद्य | हा माणूस आहे की राक्षस ? |
| | माणुसकी | १५ | गद्य | गड्या आपुला गाव बरा |
| १२ | विश्वबंधुत्व | ३ | गद्य | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे |
| | | २० | पद्य | माझ्या शब्दांनो |
| १३ | ज्ञानप्रसार/ समाजशिक्षण | ३ | गद्य | शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे |
| | | ९ | गद्य | भिक्षा मिळे जन परिक्षावे |
| १४ | ज्ञानप्राप्तीची ओढ | ७ | गद्य | आचार्य दर्शन |
| १५ | वैज्ञानिक प्रगती | ४ | गद्य | जशी संस्कृती तसे हत्यार |
| १६ | वैज्ञानिक दृष्टिकोन | ९ | गद्य | भिक्षा मिळे जन परिक्षावे |
| | | १९ | गद्य | संगणक आणि आपण |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ क्रमांक | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १७ | विज्ञानविषयक अभिरुची | १९ | गद्य | संगणक आणि आपण |
| १८ | सामाजिक प्रगती | ४ | गद्य | जशी संस्कृती तसे हत्यार |
| १९ | सामाजिक बांधिलकी/ | १७ | गद्य | बलासराव बापू |
| | सामान्यांविषयी | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त |
| | ओढ / गरिबांविषयी आपुलकी | ११ | गद्य | विष्णुपंत कुलकर्णी |
| | गरीबांविषयी आपलेपणा | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरुण |
| २० | समाजहित | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरुण |
| | समाजकल्याण | १३ | गद्य | हा माणूस आहे की राक्षस |
| २१ | सामाजिक बदलाची जाणिव | १९ | गद्य | संगणक आणि आपण |
| २२ | अहिंसा | ४ | गद्य | जशी संस्कृती तसे हत्यार |
| | | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त. |
| २३ | सहनशीलता | ४ | गद्य | जशी संस्कृती तसे हत्यार |
| | | ९ | पद्य | या दु:खाच्या कढईची |
| २४ | मुत्सद्दीपणा / व्यवहार चातुर्य | ४ | गद्य | जशी संस्कृती तसे हत्यार |
| २५ | जीजिविषा/ | ५ | गद्य | माणूस जगतो कशासाठी ? |
| | जीवनासक्ती/ | ११ | गद्य | विष्णुपंत कुलकर्णी |
| | लौकिक जीवनाची ओढ | १३ | पद्य | शापित मी तामगतो |
| २६ | जीवन निष्ठा | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरुण |
| २७ | ध्येयनिष्ठा | ५ | गद्य | माणूस जगतो कशासाठी ? |

<u>सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)</u>

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रमाण | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २८ | शौर्य | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| २९ | साहस | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ३० | निडरता | ११ | गद्य | विष्णुपंत कुलकर्णी |
| ३१ | धाडस | ५ | गद्य | हा माणूस आहे की राक्षस ? |
| ३२ | कलेचे जीवनातील महत्व | ५ | गद्य | हा माणूस आहे की राक्षस ? |
| ३३ | सेवा | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ३४ | पावित्र्य/ पूज्य बुध्दी | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ३५ | परोपकारी वृत्ती | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ३६ | शिस्त | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ३७ | विवेकयुक्त नविनता | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ३८ | स्वतंत्र विचारपध्दती/ विचारातील सूक्ष्मपणा | १२ | गद्य | मी : माणिकराव पाटील |
| ३९ | आशावाद | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| | | १८ | पद्य | खापराचे दिवे |
| ४० | तत्परता | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ४१ | तेजस्विता/ तपस्विता | ६ | गद्य | क्रांतिप्रवण तरूण |
| ४२ | गुरूनिष्ठा/ गुरूश्रध्दा | ७ | गद्य | आचार्य दर्शन |
| ४३ | जिज्ञासा | ७ | गद्य | आचार्य दर्शन |
| | | १३ | गद्य | हा माणूस आहे की राक्षस ? |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रमाण | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ४४ | निसर्गातील ईश्वरी अस्तित्व | ७ | गद्य | आचार्य दर्शन |
| ४५ | निसर्ग प्रेम | १८ | गद्य | चाफा |
| | | १२ | पद्य | पाऊस |
| ४६ | निसर्ग वर्णन | ४ | पद्य | घनश्याम सुंदरा |
| ४७ | निसर्गातील ईश्वरी अस्तित्व | ७ | पद्य | माझी माय सरसोती |
| ४८ | सृष्टीतील भव्यता | ८ | पद्य | चिंतातूर जंतू |
| ४९ | सौंदर्यबोध/ | ८ | पद्य | चिंतातूर जंतू |
| | सौंदर्यानुभव | ७ | पद्य | माझी माय सरसोती |
| ५० | असामान्यांच्या अलौकिक अनुभव | ५ | पद्य | झापुर्झा |
| ५१ | मातृप्रेम | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त |
| ५२ | ममता | १६ | गद्य | मजल्याचं घर |
| ५३ | मातृभाषेविषयी प्रेम | १ | पद्य | शांताचे या घरा |
| ५४ | कुटुंब वत्सलता | १६ | गद्य | मजल्याचं घर |
| ५५ | नम्रता/ | १ | पद्य | शांताचे या घरा |
| | लीनता | ४ | पद्य | घनश्याम सुंदरा |
| ५६ | भक्ती | १ | पद्य | शांताचे या घरा |
| | | २(अ) | पद्य | नामदेव |
| | | २(आ) | पद्य | नरहरी सोनार |
| | | ३ | पद्य | धाव धाव गा श्रीपती |
| | | ४ | पद्य | घनश्याम सुंदरा |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रमाण | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ५७ | ईश्वरी गुणगान | ४ | पद्य | घनश्याम सुंदरा |
| ५८ | परमेश्वराची आळवणी | ३ | पद्य | धाव धाव गा श्रीपती |
| | प्रार्थना | ३ | पद्य | धाव धाव गा श्रीपती |
| ५९ | ईश्वरनिष्ठा | २ | पद्य | संतवाणी (नामदेव) |
| | श्रध्दा | ९ | पद्य | या दु:खाच्या कढईची |
| ६० | संतवृत्ती | २ | पद्य | शांताचे या घरा नामदेव |
| ६१ | रूढी व अंधश्रध्दा निर्मूलन | ९ | गद्य | भिदा भिसे जन परिदावे |
| | | २(ई) | पद्य | एकनाथ |
| ६२ | सदुपदेश | ९ | गद्य | भिदा भिसे जन परिदावे |
| ६३ | समाज प्रबोधन | २(उ) | पद्य | तुकाराम |
| ६४ | दुष्टांचे पारिपत्य/ | ३ | पद्य | धाव धाव गा श्रीपती |
| | अशुभाचा संहार | ६ | पद्य | रुद्रास आवाहन |
| ६५ | आत्मोध्दार | २(उ) | पद्य | तुकाराम |
| | | ११ | पद्य | आईपणाची भीती |
| ६६ | अन्यायाचा प्रतिकार | १० | गद्य | पाटनूरचा जंगल सत्याग्रह |
| ६७ | लढाऊबाणा | ११ | गद्य | विष्णुपंत कुलकर्णी |
| ६८ | त्याग/ | १३ | गद्य | हा माणूस आहे की राक्षस ? |
| | असीम त्याग | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त |
| ६९ | राष्ट्रभक्ती | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त |
| ७० | स्वदेश प्रेम | १५ | गद्य | गड्या आपुला गाव बरा |
| ७१ | राष्ट्रीय एकात्मता | ८ | गद्य | सक्त मजुरीत मस्त |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रमाण | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७२ | स्वसंस्कृती प्रेम | १५ | गद्य | गड्या आपुला गाव बरा |
| ७३ | पारंपारिक रीति-रिवाजांचे महत्व | १७ | गद्य | बुलाखराव बाप्पू |
| ७४ | लोकसंस्कृतविषयी ज्ञान-आस्था | १४ | गद्य | बहुरूपी |
| ७५ | लोककलाकारांचा परिचय | १४ | गद्य | बहुरूपी |
| ७६ | स्वच्छता | ९ | गद्य | भिक्षामिसे जन परिक्षावे |
| ७७ | शांतता | १० | गद्य | पाटनूरचा जंगल सत्याग्रह |
| | | १ | पद्य | शांतीचे या घरा |
| ७८ | अनुभव व निरीक्षण यातून शिक्षण/ गुणग्राहकता | १२ | गद्य | मी : माणिकराव पाटील |
| ७९ | सत्याग्रह | १० | पद्य | पाटनूरचा : जंगल सत्याग्रह |
| ८० | संघटना चातुर्य | १० | पद्य | पाटनूरचा जंगल सत्याग्रह |
| ८१ | संघशक्तीचे महत्व | १९ | पद्य | गढी |
| ८२ | नेतृत्व | ११ | गद्य | विष्णुपंत कुलकर्णी |
| ८३ | स्वभावातील मोकळेपणा | १२ | गद्य | मी : माणिकराव पाटील |
| ८४ | जिव्हाळा | १५ | गद्य | गड्या आपुला गाव बरा |
| | | १६ | गद्य | मजल्याच घर |
| ८५ | जिद्द | १६ | गद्य | मजल्याचं घर |

सारणी क्र. ४.४ (पुढे चालू...)

| अनु. | मूल्याचे नाव | पाठ क्रमांक | पाठ प्रमाण | पाठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ८६ | कर्तृत्व | १६ | गद्य | मजल्याचं घर |
| ८७ | अस्मितेची जाणीव | १६ | गद्य | मजल्याचं घर |
| ८८ | परंपरा विरोध | १६<br>१९ | गद्य<br>पद्य | मजल्याचं घर<br>गढी |
| ८९ | विकासविषयक ज्ञान | १९ | गद्य | संगणक आणि आपण |
| ९० | श्रोत्यांशी जवळीक | १ | पद्य | शांताचे या घरा |
| ९१ | परमार्थ ज्ञान | १ | पद्य | शांताचे या घरा |
| ९२ | अद्वैतभाव | ३ | पद्य | धाव धाव गा श्रीपती |
| ९३ | सज्जनांचे संरक्षण | ३ | पद्य | धाव धाव गा श्रीपती |
| ९४ | कर्तव्यनिष्ठा | ४ | पद्य | घनश्याम सुंदरा |
| ९५ | संयम | ९ | पद्य | या दु:खाच्या कढईची |
| ९६ | आत्मविश्वास | १० | पद्य | शासन |
| ९७ | अध्:पतनाची खंत | १० | पद्य | शासन |
| ९८ | निर्मोहिपणा | १४ | पद्य | जाईन दूर गावा |
| ९९ | समाज जीवनाची ओढ (एकाकीपणाचे दु:ख) | १६ | पद्य | आता |

वरील सारणी क्रमांक ४.४ वरून असे आढळून येते की ' युवक भारती ' इयत्ता १२ वीच्या पाठ्यपुस्तकामध्ये असलेल्या १९ गद्य व २० पद्य अशा एकूण ३९ पाठांतून ९९ मूल्यें प्रतिबिंबित झालेली आहेत.

## ४.६ समारोप :

या प्रकरणामध्ये इयत्ता ११ वी व १२ वीच्या प्रथमभाषा मराठीच्या ' युवक भारती ' या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे पाठानुसार व मूल्य हा आधार घेऊन पाठांचे विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकामधून कोणकोणती मूल्ये प्रतिबिंबित झालेली आहेत याचे सम्यक् चित्र प्राप्त होते.

पुढील प्रकरणात प्रश्नावली, मुलाखती आणि प्रत्यक्ष भेटी आणि पाठ निरीक्षण या साधनांच्या द्वारे मिळविलेल्या संशोधनसामग्रीचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

# प्रकरण - पाच

## संशोधन सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

५.१ प्रास्ताविक

५.२ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या मराठीच्या अध्यापकांचा अध्यापन अनुभव

५.३ पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांचे प्रमुख आणि गौण विषय

५.४ बी.एड्./डी.एच.ई. च्या अध्यापन पध्दती

५.५ मूल्यशिक्षणविषयक अध्यापकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण

५.६ पाठातील मूल्यांचे विद्यार्थ्यांत जाणीवपूर्वक संक्रमण

५.७ मूल्यसंक्रमणासाठी केले जाणारे प्रयत्न

५.८ मूल्यसंक्रमणासाठी प्रयत्न करीत नसल्याची कारणे

५.९ हस्तपुस्तिकेची आवश्यकता

५.१० हस्तपुस्तिकेचे स्वरूप

५.११ मूल्ये रुजविण्यासाठी उपक्रमांची योजना

५.१२ मूल्यसंक्रमणाचे प्रमाण

५.१३ मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणी

५.१४ मूल्यसंक्रमणात येणाऱ्या अडचणींवर उपाय

५.१५ मूल्य संक्रमित न होण्याची कारणे

५.१६ मूल्यांचे मूल्यमापन

५.१७ मूल्यांचे मूल्यमापन व नोंदी

५.१८ मूल्यांचे मूल्यमापन व परीक्षा

५.१९ प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त असलेली अन्य माहिती

५.२० समारोप.

## ५.१ प्रास्ताविक :

मागील प्रकरणात (प्रकरण क्रमांक चार - इयत्ता ११ वी व १२ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यशिक्षणाच्या दृष्टीने विश्लेषण) इयत्ता ११ वी १२ वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांचे मूल्यांचे दृष्टीने विश्लेषण करून त्यामध्ये कोणती मूल्ये आढळतात या बाबींचा विचार केला. प्रस्तुत प्रकरणात उच्च माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकांच्या अध्यापनाचा मूल्य-शिक्षणाच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावण्यात आला आहे.

संशोधनासाठी सामग्री गोळा करण्याच्या हेतूने एक प्रश्नावली तयार करण्यात आली. या प्रश्नावलीची समग्र माहिती प्रकरण १ मध्ये (पहा प्रकरण १ पान क्रमांक १४ ) दिलेली आहे. प्रश्नावली परिशिष्ट ` अ ` मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील नऊ उच्च माध्यमिक शाळांतील मराठी विषय शिकविणाऱ्या सर्वांच्या सर्व अध्यापकांना देण्यात आली. तासगाव तालुक्यातील उच्च माध्यमिक शाळांतील सर्वच म्हणजे एकूण १५ अध्यापकांनी प्रश्नावली भरून परत केली. (परिशिष्ट ` ब `).

प्रश्नावलीच्या द्वारे मिळालेली माहिती पडताळून पहाण्यासाठी संशोधिकेने ६ अध्यापकांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखत घेण्यासाठी तयार केलेली प्रश्नावली परिशिष्ट ` क ` मध्ये दिलेली आहे. तसेच ज्या शिक्षकांच्या मुलाखती घेतल्या त्यांची नावे परिशिष्ट ` ड ` मध्ये दिली आहेत.

त्याचप्रमाणे संशोधिकेने उच्च माध्यमिक महाविद्यालयांना भेटी देऊन मराठीच्या अध्यापकांच्या २० पाठांचे निरीक्षण केले. ज्या शिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण केले आणि त्यांच्या ज्या पाठांचे निरीक्षण केले त्याची यादी परिशिष्ट ` इ ` मध्ये दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अध्यापकांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांचे तसेच मुलाखती आणि निरीक्षणाद्वारे उपलब्ध झालेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

## ५.२ प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या मराठीच्या अध्यापकांचा अध्यापन अनुभव :

प्रश्न क्रमांक ५ मध्ये अध्यापकांना त्यांचा मराठी विषय शिकविण्याचा अनुभव नोंदविण्यास सांगितला होता.

प्रस्तुत प्रश्नाला अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणीत (सारणी क्रमांक ५.१) वर्गीकरण केले आहे.

सारणी क्र.५.१

मराठीच्या अध्यापकांचा अनुभव

| अनु. | अनुभव (वर्षे) | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|
| १ | ४ | १ |
| २ | ६ | १ |
| ३ | ८ | २ |
| ४ | ९ | १ |
| ५ | १२ | ३ |
| ६ | १७ | १ |
| ७ | १८ | १ |
| ८ | १९ | २ |
| ९ | २० | १ |
| १० | २४ | २ |
| | २१२ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.१ वरून असे दिसून येते की, प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांचा उच्च माध्यमिक शाळेत मराठी विषय शिकविण्याचा अनुभव कमीतकमी ४ वर्षांपासून जास्तीतजास्त २४ वर्षांपर्यन्त आहे.

या अध्यापकांच्या अनुभवांच्या वर्षांचे
या सूत्रान्वये मध्यमान काढले असताना ते १४.१३ एवढे येते. इतक्या वर्षांचा अनुभव हा प्रदीर्घ नसला तरी दीर्घ आहे असे म्हणावयास हरकत नाही.

सबब प्रश्नावलीला प्रतिसाद देणाऱ्या अध्यापकांचा अनुभव दीर्घ आहे असे म्हणावयास प्रत्यवाय नसावा. प्रश्नावलीला दिलेला प्रतिसाद हा अनुभवसिध्द असल्यामुळे ग्राह्य मानावयास हरकत नाही.

## ५.३ पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांचे प्रमुख आणि गौण विषय :

मराठीच्या अध्यापकांचा पदवी परीक्षेचा प्रमुख व गौण विषय जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ६ ची (पदवी परीक्षेचा विषय - प्रमुख-गौण) योजना केली होती. प्रस्तुत प्रश्नाला दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणीत (सारणी क्रमांक ५.२) वर्गीकरण केले आहे.

## सारणी क्रमांक ५.२

**पदवी परीक्षेचा प्रमुख विषय आणि गौण विषय असणाऱ्या अध्यापकांची संख्या**

| अनु. | पदवी परीक्षेचा मुख्य विषय | अध्यापक संख्या | पदवी परीक्षेचा गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी | १३ | मराठी | २ |
| २. | इतिहास | १ | हिंदी | ३ |
| ३. | राज्यशास्त्र | १ | इंग्रजी | ७ |
| ४. | | | इतिहास | ५ |
| ५. | | | भूगोल | ३ |
| ६. | | | समाजशास्त्र | १ |
| ७. | | | राज्यशास्त्र | २ |
| ८. | | | लोकप्रशासन | १ |
| ९. | | | मानसशास्त्र | ४ |
| १०. | | | अर्थशास्त्र | १ |
| ११. | | | शिक्षणशास्त्र | १ |
| | | १५ | | ३० |

वरील सारणी क्रमांक ५.२ वरून असे निदर्शनास येते की, पदवी परीक्षेला ' मराठी ' मुख्य विषय असणारे १३ अध्यापक आहेत. ज्या दोन अध्यापकांचा पदवी परीक्षेला राज्यशास्त्र आणि इतिहास हे प्रमुख विषय आहेत त्यांचा मराठी हा गौण विषय आहे.

प्रश्नावलीच्या प्रश्न क्रमांक ७ मध्ये (पदव्युत्तर परीक्षेचा विषय - प्रमुख - गौण) पदव्युत्तर परीक्षेचा प्रमुख व गौण विषय कोणते याची विचारणा करण्यात आली होती. या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती सारणी क्रमांक ५.३ मध्ये दिलेली आहे.

<u>सारणी क्रमांक ५.३</u>

पदव्युत्तर परीक्षेस प्रमुख आणि गौण विषय
<u>असलेल्या अध्यापकांची संख्या</u>

| अनु. | पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय | अध्यापक संख्या | पदव्युत्तर परीक्षेचा गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | मराठी | १५ | समाजशास्त्र | १ |
| २. | संस्कृत | १ | | |
| | | १६ | | १ |

वरील सारणी क्रमांक ५.३ वरून असे दिसून येते की, मराठी विषय शिकविणाऱ्या सर्वच अध्यापकांनी पदव्युत्तर परीक्षेस मराठी विषय घेतलेला आहे. एका अध्यापकाने ` संस्कृत ` विषय घेऊन पुन्हा एकदा एम.ए.ची पदवी संपादन केली आहे. म्हणून अध्यापकांची एकूण संख्या १६ येते. या अध्यापकास त्याच्या संस्कृतच्या ज्ञानाचा मराठीच्या अध्यापनात निश्चितच उपयोग होत असला पाहिजे.

उच्च माध्यमिक स्तरावर मराठी हा विषय शिकविण्यासाठी पदव्युत्तर परीक्षेला मराठी हा विषय ` प्रमुख विषय ` असणे आवश्यक आहे. या दृष्टीने विचार करताना हे सर्व अध्यापक उच्च माध्यमिक स्तरावर मराठी हा विषय शिकविण्यास पात्र आहेत.

## ५.४ बी.एड्.-डी.एच.ई.च्या अध्यापन पध्दती :

उच्च माध्यमिक स्तरावर मराठी विषय शिकविण्यासाठी पदव्युत्तर परीक्षेसाठी मराठी विषय घेणे आवश्यक आहे ही जशी अट आहे त्याप्रमाणे विनित पदवीला (बी.एड्. किंवा तत्सम डी.एच.ई.) मराठी ही अध्यापन पध्दती घेणे आवश्यक आहे ही दुसरी अट आहे.

इयत्ता ११ वी १२ वीला मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांनी बी.एड्. अथवा डी.एच.ई. साठी ' मराठी ' अध्यापन पध्दती निवडली होती किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ८ ची (बी.एड्.-डी.एच.ई. असल्यास निवडलेल्या अध्यापन पध्दती १---------- २-----------) योजना करण्यात आली होती. प्रस्तुत प्रश्नाला दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.४ मध्ये वर्गीकरण केलेले आहे.

### सारणी क्रमांक ५.४

### बी.एड्.-डी.एच.ई. च्या अध्यापन पध्दती

| बी.एड्.-डी.एच.ई. साठी निवडलेल्या अध्यापन पध्दती | निवडलेली पहिली अध्यापन पध्दती मराठी | निवडलेली दुसरी अध्यापन पध्दती | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इतिहास | भूगोल | हिंदी | इंग्रजी | संस्कृत | |
| | १५ | ७ | ३ | २ | २ | १ | ३० |

वरील सारणी क्रमांक ५.४ वरून असे निदर्शनास येते की, ह्यचा ११ वी, १२ वीला ` मराठी ` विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांनी ` मराठी ` ही अध्यापन पध्दती घेतलेली होती.

५.५ मूल्यशिक्षणविषयक अध्यापकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण :

मूल्यशिक्षणविषयक अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन अध्यापकांनी अशाप्रकारचे प्रशिक्षण घेतले आहे काय ? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ९ ची (मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत प्रशिक्षण घेतले आहे काय ? ... होय-नाही, घेतले असल्यास त्याचा कालावधी...... ठिकाण.....) योजना केली होती. प्रस्तुत प्रश्नाला दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.५ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्र. ५.५

मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत प्रशिक्षण

| मूल्यशिक्षणविषयक अध्यापकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| | - | १५ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.५ वरून असे निदर्शनास येते की, १५ पैकी एकाही अध्यापकाचे म्हणजेच १०० टक्के अध्यापकांचे मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत प्रशिक्षण झालेले नाही.


मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्याबाबतचा प्रतिसाद.

सारणी क्रमांक ५.६

सूची

१ होय

२ नाही.




A-1 paper products Bombay

प्रश्न क्रमांक ९ चे उत्तर ` होय ` असे असेल तर त्यावर आधारित प्रश्न क्रमांक १० व ११ ची योजना केली होती. (प्रश्न १० - सेवांतर्गत प्रशिक्षण वर्गाच्या आयोजकाचे नाव) (प्रश्न ११ - मूल्यशिक्षणविषयक सेवांतर्गत वर्ग नेमक्या कोणत्या विषयासाठी आयोजित केला होता ?) परंतु प्रश्न क्रमांक ९ ला ` नाही ` असाच सर्वांचा प्रतिसाद आल्याने प्रश्न क्रमांक १० व ११ च्या प्रतिसादाचा प्रश्नच उद्भवत नाही.

## ५.६ पाठातील मूल्यांचे विद्यार्थ्यांत जाणीवपूर्वक संक्रमण :

मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठांचे अध्यापन करताना पाठातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याकरिता अध्यापक जाणीवपूर्वक प्रयत्न करतात किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक १६ ची (प्रत्येक पाठाची वर म्हणजेच प्रश्न क्रमांक १२ ते १६ मध्ये दिलेली मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याकरिता त्या त्या पाठांचे अध्यापन करताना आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करता का ?.... होय-नाही.) योजना करण्यात आली होती.

प्रस्तुत प्रश्नाला अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ५.६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ५.६

मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्याबाबतचा प्रतिसाद

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| मूल्यांचे जाणीवपूर्वक संक्रमण करण्याबाबतचा प्रतिसाद | १३ | २ | १५ |

वरील सारणी क्रमांक ५.६ वरून असे दिसून येते की, पाठातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याकरिता त्या त्या पाठाचे अध्यापन करताना १५ अध्यापकांपैकी १३ अध्यापक जाणीवपूर्वक प्रयत्न करतात. मूल्यसंक्रमणासाठी अध्यापन करीत असताना जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या अध्यापकांचे शेकडा प्रमाण ८६.६६ इतके आहे. ही समाधानाची बाब आहे.

असे अ जरी असले तरी अध्यापक प्रत्यक्ष अध्यापन करीत असताना त्यांच्या २० पाठांचे संशोधिकेने केलेल्या निरीक्षणावरून पुढील बाबी आढळून आल्या :

२० अध्यापकांपैकी १६ अध्यापकांनी म्हणजेच ८० टक्के अध्यापकांनी पाठात व्यक्त होणारी सर्व मूल्ये स्पष्ट केली, परंतु ४ अध्यापकांच्या अध्यापनात मूल्यसंक्रमणाच्या दृष्टीने खालील त्रुटी आढळून आल्या :

१) वीस अध्यापकांपैकी एका अध्यापकाने पाठातून व्यक्त होणाऱ्या जीवनमूल्यांपेक्षा पाठाच्या साहित्यिक मूल्यांवरच अधिक भर देऊन अध्यापन केले.
२) वीस अध्यापकांपैकी एका अध्यापकाने अध्यापन करताना पाठातील काही मूल्ये स्पष्ट केली परंतु काही मूल्ये स्पष्ट केली नाहीत. म्हणजेच सर्व मूल्ये स्पष्ट केली नाहीत.
३) एका अध्यापकाचे अध्यापन हे केवळ व्याख्यान पध्दतीनेच झाले. चर्चा, प्रश्नोत्तर इत्यादींना अजिबात वाव नव्हता. त्यामुळे पाठातील सर्व मूल्यांचे आकलन विद्यार्थ्यांना झाले किंवा नाही हे समजू शकले नाही.
४) एका अध्यापकाने भावार्थ स्पष्ट करण्यावर भर दिला परंतु त्या पाठातून व्यक्त होणाऱ्या मूल्यांवर भर दिला नाही.

सहा अध्यापकांच्या घेतलेल्या मुलाखती वरून असे निदर्शनास आले की, विद्यार्थ्यांमध्ये यशस्वीरीत्या मूल्यसंक्रमण करता यावे (व्हावे) यासाठी प्रत्यक्ष अध्यापनापूर्वी अध्यापक दैनंदिन पाठाची जी टाचणे काढतात ती काढतांना पाठात कोणती मूल्ये अनुस्यूत आहेत याचा शोध घेऊन त्यांची नोंद पूर्वनियोजनात करीत नाहीत. येथे आवर्जून असे सुचवावेसे वाटते की, विद्यार्थ्यांमध्ये यशस्वीरीत्या मूल्यसंक्रमण करता यावे यासाठी प्रत्यक्ष अध्यापनापूर्वी दैनंदिन पाठांच्या टाचणात पाठातून प्रतिबिंबित होणारी मूल्ये नोंदविली जावीत.

## ५.७ मूल्यसंक्रमणासाठी केले जाणारे प्रयत्न :

प्रत्येक पाठातील मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करण्याकरता अध्यापक प्रयत्न करीत असल्यास कोणते प्रयत्न करतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १७ ची (प्रयत्न करीत असल्यास कोणते प्रयत्न करता त्याची माहिती थोडक्यात द्या) योजना करण्यात आली होती.

सदर प्रश्नाला १३ अध्यापकांनी पुढीलप्रमाणे प्रतिसाद दिलेला आहे :

१) पाठाच्या किंवा कवितेच्या संदर्भात अव्यक्त असणारे मूल्य योग्य ती उदाहरणे व संदर्भ देऊन व्यक्त केले जाते व ते विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविले जाते.

२) अध्यापन करताना महत्वाच्या वाटणाऱ्या मूल्यांवर अधिक भर देऊन मुद्दा स्पष्ट करणे, स्पष्टीकरणार्थ अनेक उदाहरणे देणे, विद्यार्थ्यांची मते जाणण्यासाठी चर्चा घडवून आणणे, त्यांचे चुकीचे विचार दुरुस्त करणे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

३) पाठाचा आशय समजावून देणे, लेखकाने दिलेला संदेश, सांगितलेले तत्त्व यावर भर देऊन वक्तव्य करणे, चर्चा उपस्थित करून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांना ते कितपत पटले आहे याची खात्री करून घेऊन व काही शंका राहिले असल्यास ती दुरुस्त करणे.

४) प्रत्येक पाठ शिकविताना विद्यार्थ्याला पाठातील मूल्ये त्याच्या निदर्शनास आणून दिली जातात व त्यापासून आपण काही तरी बोध घेतला पाहिजे असे विद्यार्थ्यांना शिकविले जाते.

५) प्रत्येक पाठाचे अध्यापन करताना प्रभावी वाचन, कथन इत्यादी-द्वारे पाठातील मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी समर्पक उदाहरणे, दाखले दिले जातात.

६) योग्य प्रस्तावना, परिणामकारक प्रकट वाचन, उदाहरणे, दाखले, दृष्टांत यांच्या वापराने स्पष्टीकरण, कथन, चर्चा, प्रश्नोत्तर, समर्पक उदाहरणे इत्यादीद्वारे प्रयत्न केले जातात.

७) गद्य वा पद्य पाठातील मूल्ये विद्यार्थ्यांना समजावीत यासाठी समर्पक उदाहरणे दिली जातात. योग्य संदर्भाद्वारे ते मूल्य विद्यार्थ्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला जातो.

८) पाठाची प्रस्तावना करतेवेळी त्या पाठामधून स्पष्ट होणारी मूल्ये, त्यांचा आशय स्पष्ट केला जातो. पाठात जिथे संदर्भ येईल त्या त्या ठिकाणी पुन्हा त्याचे विवेचन केले जाते.

९) अध्यापनात महत्त्वाच्या मुद्यांवर भर देऊन अधिक माहिती देणे - प्रश्न पध्दतीचा वापर करून विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया जाणणे इत्यादी.

१०) समाजातील व इतर दैनंदिन जीवनातील विद्यार्थी जीवनाशी निगडीत उदाहरणे सांगणे, साहित्य प्रकाराद्वारे सत्यस्थिती निदर्शनास आणून देणे.

११) मूळ साहित्य प्रकारापेक्षा प्रत्यक्ष समाजातील वा जीवनातील इतर उदाहरणे सांगणे, काव्यमयतेला वास्तवतेचे रूप देणे, वस्तुस्थिती निदर्शन इत्यादी.

१२) अनुरूप प्रस्तावना, मार्मिक विश्लेषण, पौराणिक व चरित्र कथांचा वापर, अभिनय, आवाजात आरोह-अवरोह, प्रश्न पध्दती, वृत्तपत्रातील ताज्या घडामोडी, वगैरे माध्यमातून प्रयत्न केले जातात.

१३) अधिक समर्पक संदर्भ देणे, उदाहरणे-दाखले-दृष्टांत देणे, चर्चा करणे, प्रश्नोत्तर इत्यादी.

वरील प्रतिसाद अध्यापकांच्याच शब्दात दिला असल्याने त्यात पुनरुक्ती आढळून येते. ही पुनरुक्ती काढून शिक्षक कोणते प्रयत्न करतात त्याचे वारंवारितेच्या स्वरूपात पुढील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.